जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
पुढारी

# संशोधनातून वास्तवाचे दर्शन : कुलगुरू शिर्के

● शिवाजी विद्यापीठात मास कम्युनिकेशन विभागातर्फे माध्यम संशोधन कार्यशाळाअ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

संशोधनातून वास्तवाचे दर्शन होते. कोणत्याही समस्येच्या मुळांपर्यंत जाण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरत असते, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित माध्यम संशोधन कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन अमरावती येथील मीडिया विभागाचे सहायक प्रा. डॉ. विनोद निताळे, अहिल्यानगर येथील कम्युनिकेशन स्टडीजचे माजी विभागप्रमुख डॉ. बापू चंदनशिवे उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, कोणत्याही विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी संशोधन आवश्यक असते. मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करावी लागते. माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि त्यानंतर तथ्यांची मांडणी करावी लागते. हे सर्व करण्यासाठी विविध सॉफ्टवेअरचा वापर करावा लागतो. संशोधकांनी अनेक स्रोतांद्वारे डेटा संकलित करून त्याचे विश्लेषण आणि सादरीकरण करेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया संशोधनाचा एक भाग आहे. समस्यांची सोडवणूक करायची असेल तर चांगल्या प्रतीचे संशोधन होणे आवश्यक आहे.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जयप्रकाश पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. उद्देश पाटील याने सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
लोकमत

# समस्येच्या मुळापर्यंत जाण्यास संशोधन उपयुक्त : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधनातून वास्तवाचे दर्शन होते. कोणत्याही समस्येच्या मुळांपर्यंत जाण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरत असते, असे मत कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने आयोजित माध्यम संशोधन कार्यशाळेच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनच्या अमरावती कॅम्पसमधील मीडिया विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, अहिल्यानगर येथील कम्युनिकेशन स्टडीजचे माजी विभागप्रमुख डॉ. बापू चंदनशिवे उपस्थित होते. समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. जयप्रकाश पाटील यांनी परिचय करून दिला. उद्देश पाटील याने सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

07 FEB 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शास्त्रीय गायनाने संगीत रजनीला प्रारंभ

## चिन्मयी आठले-ओक यांचे गायन तर पंडित सुधीर नायक यांचे संवादिनी वादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

चिन्मयी आठले-ओक यांच्या बहारदार शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीला सुरुवात झाली. विदुषी वीणा सहस्रबुध्दे, वंदना आठल्ये, रचना बोडस, शाश्वती मंडल यांच्या तालमीत तयार झालेल्या या गायिकेने ग्वाल्हेर घराण्याची गायकी अगदी लिलया साकारली. सुरुवातीला श्री राग सादर करून रसिकांची मने जिंकली. टाळ्यांच्या गजरात रसिकांनी गायकांना दाद दिली.

निमित्त होते शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीचे. राम गणेश गडकरी हॉलमधील संगीत रजनीतील कलाकारांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, पंडित विनोद डिग्रजकर, विनोदकुमार लोहिया यांच्या हस्ते



कोल्हापूर : राजर्षी शाहू संगीत रजनीमध्ये शास्त्रीय गायन करताना चिन्मयी आठले-ओक, संवादिनी साथ स्वरूप दिवाण, तबलासाथ प्रशांद देसाई आदी.

पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

चिन्मयी आठले-ओक यांनी तीनतालामध्ये जग मग ज्ञान ज्योत ही बंदिशी सादर केली. त्यानंतर मध्यलय त्रितालामध्ये 'चलो री माई' ही बंदिश सादर केली. त्यानंतर आडा चौतालामधील तराना अतिशय बहारदारपणे सादर केला. त्यानंर राग तिलक कामोदमध्ये पंडित रामाश्रय झा यांची 'मोरी पत राखो' ही बंदिशी सादर केली. कबिराचे भजन सादर केले. आकारयुक्त व वैशिष्ठ्पूर्ण अशा गायकीने रसिकांची मने जिंकली. त्यांना संवादिनी साथ स्वरूप दिवाण यांनी तर तबलासाथ प्रशांत देसाई यांनी केली.

संवादिनी वादक पंडित तुळशीदास बोरकर यांचे शिष्य पंडित सुधीर नायक यांच्या एकल संवादिनी वादनाने दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. त्यांनी राग बिहागमध्ये ताल झपतालातील रचना सादर केली. गायकी अंगाने सादर केलेल्या संवादिनी वादनाला रसिकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. त्यानंतर त्यांनी राम बसंत बहारमधील ताल रुपकमधील रत्नकांत रामनाथकर यांच्या पारंपरिक रचना सादर केल्या. तसेच पंडित नायक यांचे गुरू पी. मधुकर यांची राग तिलक देसमधील तीनतालातील रचना सादर केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात नाट्यपद, ठुमरी या रचना अतिशय बहारदारपणे सादर करून भैरवी वादनाने कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी पंडित अरूण कुलकर्णी, पंडित सुधीर पोटे, डॉ. शीतल धर्माधिकारी, पंडित राजप्रसाद धर्माधिकारी, सुचित्रा मोर्डेकर, डॉ. ज. ल. नागावकर यांच्यासह रसिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाला अन्वेषण संशोधन स्पर्धेत तीन पारितोषिके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवी मुंबई येथील डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठात झालेल्या 'पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा २०२४-२५' मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी तीन पारितोषिके मिळविली. त्यामुळे अंबाला येथे मार्चमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेमध्ये स्थान प्राप्त केले.

कृषी व संलग्न क्षेत्रे गटात विघ्नेश पाटील, ताहीर मुल्ला व दीक्षा घोसरवाडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गटात शुभम गिरीगोसावी, बालाजी पाटील व रोहित गवळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मूलभूत विज्ञान गटात सुषमा राजीव देशमुख व अनुष्का रॉय यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. विजेत्यांना भारतीय विद्यापीठ महासंघाच्या (एआययू) संशोधन विभागाचे संचालक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते व रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एम. डी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली.

संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मानसिंगराज निंबाळकर व सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाच्या डॉ. नेहा जोशी यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
लोकमत

# डॉ. विवेक धूपदाळे विभागप्रमुखपदी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागाच्या विभागप्रमुखपदी डॉ. विवेक यशवंत धूपदाळे यांची नियुक्ती करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
पुढारी

संक्षिप्त

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. प्रल्हाद माने समूह समन्वयक



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक व राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठविले आहे. डॉ. माने यांच्याकडे चार राज्यातील सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ संघाने या स्पर्धेत दोन वेळा राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचून पारितोषिके पटकावली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025
सकाळ

# नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी साकारला 'वहिवाट'

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी 'वहिवाट' या चित्रपटाच्या निमित्ताने गुरूंचे स्वप्न पूर्ण केले आहे. उद्या (ता. ७) पासून हा चित्रपट रसिकांच्या भेटीला येणार आहे. येथील मातीतील अस्सल कलापूरचा हा चित्रपट असून रसिकांनी तो आवर्जुन पाहावा, असे आवाहन निर्माता व दिग्दर्शक डॉ. संजय तोडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे शिक्षक (कै) विजय पवार यांचे निधन झाले. पण त्यांचे स्वतः लिहिलेल्या कथानकावर चित्रपट बनवण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न त्यांच्या त्या काळातील विद्यार्थी कलावंतांनी एकत्र येऊन पूर्ण करायचे ठरवले आणि आता हा चित्रपट रसिकांच्या भेटीला आला आहे. ज्येष्ठ अभिनेते भालचंद्र कुलकर्णी यांचाही हा अखेरचा चित्रपट असून साहित्यिक राजाभाऊ शिरगुप्पे यांच्याही स्मृतींना यानिमित्ताने उजाळा मिळणार आहे. कोल्हापूरसह कोकण आणि मुंबई परिसरात चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून, कलाकारांसह तंत्रज्ञांची संपूर्ण टीम कोल्हापुरातील आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 FEB 2025

तरुण भारत

# विश्वाचा पसारा मानवी शोधाच्या पलिकडे

- खगोल शास्त्रज्ञ किरण गवळी

**कोल्हापूर :** पृथ्वीतलावरील मानवाचे स्थान नगण्य असून त्यांनी लावलेल्या शोधाच्या पलिकडेदेखील विश्वाचा पसारा अफाट असल्याचे मत खगोलशास्त्रज्ञ किरण गवळी यांनी व्यक्त केले. त्यांनी यूरोप, अमेरिकेच्या तुलनेत भारताची वैज्ञानिक प्रगती अल्प असल्याची खंत ही व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागातील आयोजित ''विश्वाचा पसारा' या कार्यक्रमात त्या बोलत होते. गवळी म्हणाल्या, ग्रह, तारे, नक्षत्रे, राशींसह ब्रुनो, गॅलेलिओ, न्यूटन पासूनचा सुनीता विलियम्सपर्यंतचा प्रवासाचे अवकाशदर्शन पीपीटीच्या माध्यमातून करून दिले. अध्यक्षस्थानी हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या. प्रस्तावना डॉ. प्रकाश मुंज यांनी केले. आभार डॉ. संतोष कोळेकर यांनी मानले. यावेळी डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. राजश्री बारवेकर, प्रा. अनिल मकर, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले, डॉ. सुवर्णा गावडे, हेमंत जाधव, अविनाश कांबळे, आनंद बेडगे, मंदार शिंदे आदी उपस्थित होते.

07 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# कला, विज्ञानापेक्षा अभियांत्रिकीकडे वाढला ओढा

**चंदगड**


**निंगाप्पा बोकडे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**चंदगड :** अनेक वर्षांपासून अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त असतानाच नवीन शैक्षणिक धोरण राबविण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. तालुक्यातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन शाखांमधील विद्यार्थ्यांची संख्या रोडावत चालली असून, अभियांत्रिकी, बीसीए, नर्सिंग, हॉटेल मॅनेजमेंटकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढल्याचे चित्र अलीकडे पाहावयास मिळत असले तरी या शिक्षणासाठी गडहिंग्लज, बेळगाव, कोल्हापूरसह इतरत्र जावे लागते.

**शिक्षणाचा परीघ**
भाग -१०

राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे मेडिकल, अभियांत्रिकीसह इतर कोर्सेसची सोय तालुक्यात आजवर झाली नाही. ती पूर्ण झाल्यास तालुक्यातील विद्यार्थ्यांची परवड थांबणार असल्याचे शिक्षणप्रेमींचे म्हणणे आहे. 'प्रवेश घ्या, तुम्हाला आम्ही सवलत देऊ, फक्त तुम्ही परीक्षेला' असे प्रकार काही महाविद्यालयांत वाढल्यामुळे शैक्षणिक विकासात अडसर निर्माण झाला आहे. जिल्हा परिषद व खासगी शाळांत सेमी इंग्रजी पॅटर्न राबविला जात आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | ५ | नर्सिंग महाविद्यालय - | १ |
| चित्रकला महाविद्यालय | १ | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय | १ |
| बीसीए कॉलेज | १ | शिक्षणशास्त्र महाविद्यालय | १ |



| | |
|---|---|
| माध्यमिक शाळा | ६० |
| **प्राथमिक शाळा** | ११७ |
| इंग्रजी शाळा | ११ |
| **उच्च माध्यमिक शाळा** | १४ |
| उर्दू शाळा | ३ |



पहिली ते बारावी विद्यार्थी संख्या
**२७०४७**

महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या
**६९२८**

“
नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना आवडीचे शिक्षण घेता येणार आहे. कला, वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना यांचा अधिक फायदा नक्कीच होऊ शकतो.
**- प्रा. डॉ. बी. डी. अजळकर प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी**